सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा कार्यवाहीसाठी कालबध्द कार्यक्रम करण्याबाबत सुधारित सूचना

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३१/०८/२०२३

**संदर्भ** :- १) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक :- सीएटी/२०१७/प्र.क्र.८/इमा-२, दिनांक २७/०९/२०१८
२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२, दि.०७/०८/२०२३

**प्रस्तावना** :-

संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ अन्वये निविदा स्विकृती संदर्भात कालमर्यादा निश्चित करण्यात आली होती. शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या निविदा प्रस्तावांचा अभ्यास केला असता, निविदा निश्चितीमध्ये कालापव्यय होत असल्याचे प्रकर्षाने निदर्शनास आले आहे. निविदा प्रक्रियेमध्ये गतिमानता आणण्यासाठी शासन स्तरावर सांगोपांग विचार करुन दि. ०७/०८/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निविदा प्रसिध्दी कालावधीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यास अनुसरून निविदा स्विकृती व अनुषांगिक बाबींच्या संदर्भातील कालमर्यादेमध्येही सुधारणा करण्यात येत असून दि. २७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. ५.२ (निविदा स्विकृती संदर्भातील कालमर्यादा) अधिक्रमीत करुन खालील प्रमाणे सुधारीत सूचना देण्यात येत आहेत :-

**निविदा स्विकृती संदर्भातील कालमर्यादा :-**

जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर निविदा प्राप्त करुन घेणे, उघडणे, कागदपत्रांची तडताळणी करणे, प्राप्त तक्रारींचे निवारण करणे, मंजूर करणे व कंत्राटदारास कार्यारंभ देणे इत्यादी कार्यवाहीस वेळेचे बंधन असणे आवश्यक आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी ही कार्यवाही खाली दिलेल्या तक्त्यानुसार पूर्ण करावी.

| अ.क्र. | कार्यवाही | कमाल निविदा व कालावधी (दिवसामध्ये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | रू. १० लक्ष ते १.५ कोटी | रू. १.५ कोटी ते २५ कोटी | रू. २५ कोटी ते १०० कोटी | रु. १०० कोटी पेक्षा जास्त |
| १. | निविदा प्रसिध्द करुन वृत्तपत्रे प्राप्त करुन घेणे | ० | ० | ० | ० |
| २. | निविदा प्राप्त होण्याचा किमान कालावधी B-१/SBD निविदासाठी | ८ | १५ | २१ | ३० |

| अ.क्र. | कार्यवाही | कमाल निविदा व कालावधी (दिवसामध्ये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | रू. १० लक्ष ते १.५ कोटी | रू. १.५ कोटी ते २५ कोटी | रू. २५ कोटी ते १०० कोटी | रु. १०० कोटी पेक्षा जास्त |
| ३. | लिफाफा क्र.१ (तांत्रिक लिफाफा) उघडणे | **निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापासून कमाल तीन दिवसांमध्ये** | | | |
| ४. | निविदा पूर्व बैठकीचा दिनांक (निविदा प्रसिध्द झाल्यानंतर) | **आवश्यकता नाही** | **निविदा प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून सात दिवसानंतर** | | |
| ५. | CSD अपलोड करणे | **आवश्यकता नाही** | **निविदा पूर्व बैठकीनंतर कमाल तीन दिवसांमध्ये** | | |
| ६. | लिफाफा क्र.१ ची समिती मार्फत पडताळणी करणे (अ.क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या कालावधीनुसार लिफाफा क्र. १ उघडल्यानंतर) | ५ | ७ | ७ | १० |
| ७. | निविदाधारकाच्या उपस्थित मुद्यांचे निराकरण करणे व अंतिम पात्र निविदाधारकांची यादी करणे | ३* | ५* | ५* | १०* |
| | | ***सदर कालावधी अनिवार्य असून या कालावधी पेक्षा जास्त कालावधी लागल्यास त्यासाठी सबळ कारणमिमांसा नमूद करणे अनिवार्य आहे.** | | | |
| ८. | पात्र निविदा धारकाची यादी तयार केल्यानंतर लिफाफा क्र.२ (वित्तीय लिफाफा उघडणे) | १ | १ | १ | १ |
| ९. | निविदा मंजूरीचा प्रस्ताव तयार करुन सक्षम अधिका-याकडे मंजूरीसाठी सादर करणे | १ | ३ | ३ | ५ |
| १०. | निविदा मंजूरीची कार्यवाही करणे | २ | ७ | ७ | १५ |
| | **एकूण** | २३ | ४१ | ४७ | ७४ |
| ११. | ठेकेदारास प्रतिपूर्ती रक्कम सादर करण्याचे पत्र पाठविणे | २ | २ | ५ | ५ |
| १२. | कंत्राटदाराने प्रतिपूर्ती रक्कम निर्धारित वेळेत न भरल्यास त्याची निविदा रद्द करुन द्वितीय निविदा धारकासमवेत शहानिशा करुन पुढील कार्यवाही करावी कालावधीत कोणताही --- वाढ देणार नाही. | ५ | १० | १० | १० |
| | **एकूण** | ३० | ५३ | ६२ | ८९ |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२३०८३११५१७५९७४१८ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सचिन चिवटे )**
**अवर सचिव (इमारती), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सार्वजनिक बांधकाम विभाग/वित्त विभाग/ग्राम विकास विभाग
महालेखापाल-१/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई/नागपूर

**प्रत, महासंचालक, माहिती व प्रसिध्दी महासंचालनालय, मुंबई यांना प्रसिध्दीसाठी**

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी,
सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, (विद्युतसह)
मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई
संचालक, उद्याने व उपवने, मुंबई
सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग, (विद्युत / यांत्रिकी)
अधीक्षक अभियंता यांनी आपल्या अधिनस्त विभागातील कार्यालयांना सदर शासन निर्णयाची प्रत अग्रेषित करावी.
मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई
सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, सा.बां.वि.,मंत्रालय, मुंबई
कार्यासन इमारती-२ (निवड नस्ती).